विषय इतिहास

मार्च-२०१६

संशोधन आराखडा

" शहाजीराजे भोसले यांचे

निजामशाही, आदिलशाही व मोगलशाहीशी

असलेले संबंध : एक चिकीत्सक अभ्यास"

(इ.स. १६०६ ते इ.स. १६३६)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील सामाजिक शास्त्रे शाखेतील इतिहास विषयाच्या विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीकरीता सादर करावयाचा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधक

अमोल अंकुशराव मिठे

एम.ए. इतिहास

अयोध्यानगर, अंबड रोड, जालना.

मो.नं. - ९९६०२५०२५१

ई-मेल - mitheamol@gmail.com

Category :- Open-Maratha

मार्गदर्शक

प्राचार्य डॉ. आर. एस. फुन्ने

स्व. नितिन कला व विज्ञान महाविद्यालय, पाथरी,

जि. परभणी

मो. नं. - ९४२२८९२०५७

ई-मेल - rsfunne@gmail.com

१. प्रस्तावना :-

१७ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्र-कर्नाटकात प्रचंड राजकीय उलथापालथ सुरू होती. अहमदनगरची निजामशाही आणि विजापूरची आदिलशाही यांच्यात संघर्ष सुरू होता तशातच दिल्लीच्या मोगली सत्तेनेही या भागाकडे आपला मोर्चा वळविला. शहाजीने आपले युध्दकौशल्य डोळ्यात भरेल अशा तऱ्हेने प्रथम दाखविले. ते नगर पासून सुमारे दहा मैलांवर असलेल्या भातवडीच्या लढाईत इ. स. १६२४ मध्ये. मोगल -निजामशाही संघर्षातील एक उल्लेखनिय लढाई भातवडी येथे १६२४ मध्ये झाली. विजापूरच्या आदीलशाहीच्या फौजाही यावेळी मोगलांना मिळाल्या. मलिक अंबरने व शहाजी राजांनी पराक्रमाची शर्थ करून मोगल व आदिलशाही सैन्याचा पराभव केला. शहाजी राजांचा दबदबा वाढला. भातवडीच्या या लढाईमध्ये शहाजीने मोठा पराक्रम दाखविला आणि त्यांचा धाकटा भाऊ शरीफजी हा मारला गेला. शहाजीराजांची वाढती प्रतिष्ठा निजामशाहीतील अनेक सरदारांना अस्वस्थ करीत होती. स्वत: मलिक अंबरलाही शहाजीचे वाढते प्रस्थ सहन होईना. शहाजी राजांनी निजामशाही सोडली व आदिलशाही दरबारी दाखल झाले.

आदिलशहाने शहाजीराजांना 'सरलष्कर' हा किताब देऊन बहुमान केला. विजापूरकरांच्या वतीने आता ते निजामशाहीवर चालून आले. पुणे-सुपेची जहागिरी शहाजी राजांकडेच राहिली. आदिलशहाने तो प्रदेश आता शहाजीराजांना बहाल केला होता. आदिलशाही सुलतान इब्राहीम आदिलशहा शहाजी राजांच्या कर्तृत्वावर खुष होता. परंतु १६२७ साली इब्राहीम आदिलशहाचे निधन झाले याचवेळी निजामशाहीचा प्रमुख मलिक अंबर मरून गेला होता. यामुळे शहाजीला अदिलशाही सोडून निजामशाहीत जाणे अधिक फायद्याचे वाटले. म्हणून तो इ. स. १६२८ च्या आरंभी आदिलशाही सोडून पुन्हा निजामशाहीत परत आला.

शहाजीला निजामशाहीत परत आल्यावर मोगलांशी लढण्याचा प्रसंग आला. निजामशाहीत शहाजीचा सासरा लखुजी जाधव यांचा खुन झाला. काही काळ (१६३०) शहाजी मोगलांना मिळाला पण तेथे पंचहजारी मनसब मिळाली म्हणून शहाजी राजे परत निजामशाहीत येऊन १६३६ पर्यंत निजामशाहीच्या वतीने मोगलांशी लढत राहिले. इ. स. १६३१ ते १६३६ च्या दरम्यान स्वत: मोगल बादशहा शहाजहान दौलताबादेस मुक्कामाला आला. मोगल - आदिलशहा यांच्या संयुक्त सेनेने इ. स. १६३६ साली निजामशाहीचा पराभव करून ती कायमची संपवली.

२. विषय निवडीचा उद्देश :-

" शहाजीराजे भोसले यांचे निजामशाही, आदिलशाही व मोगलशाहीशी असलेले संबंध : एक चिकीत्सक अभ्यास" (इ.स. १६०६ ते इ.स.१६३६) हा संशोधनाचा विषय असून या विषयाचा उद्देश असा की, या कालखंडातील शहाजीराजे व त्यांचे निजामशाहीशी, आदिलशाही व मोगलशाहीशी असलेले संबंध अत्यंत गुंतागुंतीचे असून याबद्दलची माहिती त्रोटक स्वरूपात प्रकाशित झाली आहे असे बरेच अप्रकाशित कागदपत्रे आहेत ते प्रकाशित करण्यासाठी दुर्मीळ साधनांद्वारे प्रकाशीत करण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

३. संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

1) शहाजीराजेंचा निजामशाहीशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.
2) शहाजीराजेंचा आदिलशाहीशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.
3) शहाजीराजेंचा मोगलशाहीशी असलेल्या संबंधांचा अभ्यास करणे.
4) सतराव्या शतकाच्या पूर्वार्धात दख्खनमधील कर्तबगार सरदार म्हणून शहाजीराजेंच्या व्यक्तीमत्वाचा अभ्यास करणे.
5) शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या हिंदवी स्वराज्याचा पाया शहाजीराजांनी घातला हे सिध्द करणे.

४. गृहीतके :-

1) शहाजीराजांनी दक्षिण भारतात स्वतः च्या हुशारीने व पराक्रमाने प्रभाव निर्माण केला होता.
2) दख्खन मधील राजकारणावर निजामशाही, आदिलशाही व मोगलशाही यांचा प्रभाव होता.
3) निजामशाही, आदिलशाही व मोगलशाही या तिन्ही शाह्या दक्षिण भारतावरील राजकीय वर्चस्वासाठी सतत लढाया करत.
4) भौगोलिकदृष्ट्या अहमदनगरची निजामशाही ही उत्तर भारतातील मोगलशाही व दक्षिण भारतातील आदिलशाही या दोन्ही शाह्यांमधील एक महत्वाची राजकीय सत्ता व दुवा होती.
5) शहाजी राजांनी तिन्ही शाह्यांअंतर्गत स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व व दरारा निर्माण केला होता.

५. संशोधनपध्दती :-

" शहाजीराजे भोसले यांचे निजामशाही, आदिलशाही व मोगलशाहीशी असलेले संबंध : एक चिकीत्सक अभ्यास" (इ.स. १६०६ ते इ.स.१६३६) हा संशोधनाचा विषय असून यासाठी मी सर्वेक्षण आणि संदर्भसाधने या पध्दतीचा वापर करणार आहे.

हा शोधप्रबंध लिहीण्यासाठी दुर्मिळ व अप्रकाशीत कागदपत्रे तसेच मोडी, संस्कृत, फारसी व उर्दु भाषेतील ग्रंथ व पत्र व्यवहार, तसेच या विषयाशी निगडीत तज्ञ व्यक्तींकडून मी जाणून घेईल, त्यासाठी पुणे विद्यापिठातील जयकर ग्रंथालय, अहमदनगर येथील शासकीय ग्रंथालय, पुणे येथील पेशवे दफ्तर, विजापूर येथील ग्रंथालय यांचा आधार घेईल. माझ्या शोधप्रबंधाची मांडणी एकूण ७ प्रकरणात असून शेवटी संदर्भग्रंथांची सुची दिली आहे.

प्रस्तुत संशोधन विषय संदर्भ पध्दतीचा असला तरी, सखोल विस्तारीत संशोधन व्हावे म्हणून विषयाच्या अनुषंगाने मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

६. संशोधनाची कालमर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाचा विषय इ.स. १६०६ ते इ.स. १६३६ या ३० वर्षांच्या कालखंडातील असून त्यासाठी १७ व्या शतकातील विषयाशी संबंधित संदर्भ साधनांचा उपयोग करावयाचा आहे.

७. संशोधनाची भौगोलिक मर्यादा :-

प्रस्तुत संशोधनाची भौगोलिक मर्यादा ही महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यांपुरती मर्यादित आहे.

८. प्रकरण योजना :-

१. पार्श्वभुमी.

२. अहमदनगर व विजापूर प्रांताची भौगोलिक रचना.

३. शहाजी राजे व निजामशाही.(इ.स. १६०६ ते इ.स.१६२५)

४. शहाजी राजे व आदिलशाही. (इ.स. १६२५ ते इ.स.१६२८)

५. शहाजी राजे व निजामशाही. (इ.स. १६२८ ते इ.स.१६२९)

६. शहाजी राजे व मोगलशाही (इ.स. १६२९ ते इ.स.१६३२)

७. शहाजी राजे व निजामशाही (इ.स. १६३२ ते इ.स.१६३६)

८. हिंदवी स्वराज्याचा पाया - शहाजी राजे भोसले.

९. उपसंहार

१. पार्श्वभुमी :

बाबाजींच्या काळात भोसले घराणे हे एक पाटीलकी करणारे घराणे होते. वरूळचे पाटील बाबाजी भोसले हे होते. बाबाजी हे वेरूळ, जिंती, मूंगी, देऊळगाव , हिंगणी, बेरडी, वावी, बनसेंदे इ. दहा गावाचे पाटील होते. त्यांचा काळ १६ व्या शतकाचा उत्तरार्ध मानल्या जातो.

बाबाजीस मालोजी व विठोजी ही दोन मुले होती. मालोजी आणि विठोजी हे दोघेही खूप पराक्रमी होते. महाराष्ट्रातील सत्ता संघर्षात त्यांचे पराक्रम घडत होते. मालोजीला निजामशाहीत सरदारकी मिळाली. निजामशाही आणि आदिलशाही संघर्षात मालोजीचा पराक्रम वाखाणला गेला. मोलोजीला 'राजे' हा किताब मिळाला. पाच हजारी मनसब मिळाली. निजामशाही आणि मोगलशाही संघर्षातही मालोजी अहमदनगरच्या निजामशाही सलतनतीच्याच बाजूने लढला. त्यास पूणे, सुपे, चाकण आणि इंदापूर हे चार परगणे मिळाले. याच वेळी मालोजी राजांच्या ताब्यात शिवनेरी किल्लाही आला. निजामशाहीचा वजीर मलीक अंबर, याचा साथीदार म्हणून मालोजीचे वर्चस्व वाढत होते. अशा वेळी इंदापूरच्या गढीवर मालोजीचा मुक्काम होता तेव्हा मालोजीवर मलीक अंबरच्या विरोधी गटाने हल्ला केला आणि लढाई होऊन त्यात इ.स. १६०५ ला मालोजीस मृत्यू आला.

मालोजी राजाचा संबंध निजामशाहीतील इतर मातब्बर मराठा सरदारांशीही आला. फलटणच्या निंबाळकरांची मुलगी उमाबाई ही मालोजी राजाची पत्नी होती. या निंबाळकरांचे नातेसंबंध सिंदखेडच्या लखुजी जाधव या ऐंशी गावांचा देशमुख असणाऱ्या आणखी एका मातब्बर सरदाराशी होते.

२. अहमदनगर व विजापूर प्रांताची भौगोलिक रचना :-

अहमदनगर प्रांत: अहमदनगर प्रांत हा महाराष्ट्र राज्यात असून उत्तरेस सातमाळा व अजिंठ्याच्या डोंगररांगा तर दक्षिणेस हरिश्चंद्र व बालाघाटच्या डोंगररांगा आहेत.

अहमदनगर हा प्रांत देशावर येत असून दख्खनच्या पठारी प्रदेशात येतो. पश्चिमेस सह्याद्री पर्वताच्या रांगा या उत्तर - दक्षिण दिशेने पसरलेल्या आहेत. अहमदनगर प्रांताच्या उत्तरेस गोदावरी प्रवरा व मुळा नदीचे खोरे, तर दक्षिणेस घोड व भीमा नदीचे खोरे आहे.

अहमदनगर शहरातून सीना ही नदी वाहत असून विविध लहान-मोठ्या नद्यांनी वाहून आणलेल्या गाळामूळे अहमदनगर प्रांताची जमीन ही अत्यंत सूपीक आहे.

विजापूर प्रांत : विजापूर हा प्रांत कर्नाटक राज्याच्या उत्तर भागात येत असून या प्रांतात महाराष्ट्रातील सांगली व सोलापूर या जिल्ह्याचा काही प्रदेश येतो. विजापूर प्रांत दख्खनच्या पठारावर येत असून पश्चिमेस सह्याद्री पर्वताच्या रांगा उत्तर-दक्षिण दिशेने पसरलेल्या आहेत. विजापूर प्रांताच्या उत्तरेस भीमा नदीचे खोरे तर दक्षिणेस कृष्णा, घटप्रभा व मलप्रभा या नद्यांचे खोरे आहे. पूर्वेस भीमा व कृष्णा नद्यांचा सगम आहे.

विजापूर शहरातून वाहणारी नदी व विविध लहान मोठ्या नद्यांनी वाहून आणलेल्या गाळामुळे विजापूर प्रांताची जमीन अत्यंत सूपीक आहे.

३. शहाजी राजे व निजामशाही (इ.स. १६०६ ते इ.स. १६२५) :-

मालोजीराजे भोसले यांचा मृत्यु इंदापुर येथे झालेल्या इ.स.१६०५ च्या लढाईत झाला. शहाजी त्यावेळी पाच वर्षाचा होता. पित्याच्या पाच हजारीचा भार त्याला त्याच्या अकराव्या वर्षीच अंगावर घ्यावा लागला. नंतर पाच-सहा वर्षांनी तो मलिक अंबर बरोबर लढाईवरही जाऊ लागला. कारण जहांगीरने आपली उत्तरेकडील सत्ता स्थिरस्थावर केल्यानंतर पुन्हा दक्षिणेतील आघाडी उघडली. इ.स.१६२१ पर्यंत लखुजी जाधव व मलिक अंबर यांचा शहाजीस आधार होता. चुलतभाऊ संभाजी हाही त्याला मदतगार होता, परंतु इ.स.१६२१ मध्ये लखुजी जाधव मोगलाईत गेला आणि शहाजीचा एक आधार तुटला. परंतु या वेळी शहाजी वीस-एकवीस वर्षाचा झाला होता. लढाया चालूच होत्या. इ.स. १६२३ मधे त्याचा मोठा चुलतभाऊ संभाजी भोसले, सरदार

खंडागळे याच्या हत्तीच्या प्रकरणात लखुजी जाधवांकडून मारला गेला. शहाजीही जखमी झाला. संभाजी भोसलेंच्या मृत्यूनंतर या घराण्यांत बेबनाव उत्पन्न झाला. इ.स.१६२४ च्या भातवडीच्या लढाईत शहाजीचे पुष्कळ पराक्रम गाजवला, परंतु अंतर्गत भांडणाच्या त्रासामुळे शहाजीला आपल्या पुणे जहागीरीत जाऊन बसावे लागले.

४. शहाजी राजे व आदिलशाही (इ.स.१६२५ ते इ.स.१६२८) :-

इ.स.१६२५ मधे आदिलशाहाने बरीच लालूच दाखवल्याने शहाजी आदिलशाही नोकरीत शिरला. येथपर्यंतचा बराचसा शहाजीचा काळ मलिक अंबरवर अवलंबून राहण्यात गेला. शहाजीने जरी श्रीगोंद्यास व जिंतीस आपले ठाणे ठेवलेले होते तरी सरंजामी उत्पन्नाच्या दृष्टीने बरीच अनिश्चितता भासत होती. मोगली स्वाऱ्या बऱ्याच दूरवर घुसत होत्या. नुकसान करीत. त्यामुळे सैन्याचा बराच खर्च मलिक अंबर सरकारी खजिन्यातून देत असे. एक भाऊ शरीफजी होता तो भातवडीच्या युद्धात मारला गेला. विठोजीच्या मुलांकडील सरंजामाचा मुलूख मोगलांनी घेतला होता. अशा परिस्थितीत भांडणे लागली. त्याचे मुख्य कारण म्हणजे शहाजीला आदिलशाहाने मोगलांविरूद्ध जी पाच हजार सैन्याची निजामशाहास मदत करावयाची त्याबद्दल जो सरंजामादाखल आदिलशाही सेनापतीला मुलूख मिळावयाचा तो सुभा आदिलशाहाने केलेल्या भातवडीच्या लढाईमुळे जप्त करून शहाजीला दिला. शहाजीच्या चुलतभावांना त्यात काही प्राप्ती झाली नव्हती. भातवडीच्या लढाईने शहाजीची कीर्ती बरीच पसरली, परंतु त्याचबरोबर ही घरगुती भांडणे वाढीस लागली. तेव्हा आपसात झगडा करीत राहण्यापेक्षा शहाजीने दूर जाणे पत्करले. येथपर्यंत शहाजीला शौर्यकर्मालाच वाव होता. इतर कारभारात फारसा संबंध नव्हता. मोठमोठ्या सेनापतींनाही अनिश्चित वातावरणात राहावे लागते ही गोष्ट मात्र शहाजीला खटकुन राहिली होती. हा वयाच्या पंचविसावी पर्यंत मिळालेला अनुभव नवीन चाकरीत शिरतांना शहाजीला बराच मार्गदर्शक झाला.

सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धात आदिलशाही पुष्कळच हीनबल होऊन राहिली होती. निजामशाहीशी होता होई तो मिटते घेण्याचीच नेहमी तयारी असे. एक तर दक्षिणी सलतनतींना मोगली सरहद्दीवर ही निजामाची अडसर एक संरक्षक फळीच होऊन राहिली होती. साहजिकच मोगली परचक्रांचे संकट दूर राखावयाचे तर निजामशाही सबळ व जिवंत ठेवावयास पाहिजे होती. म्हणून आत्मसंरक्षणार्थ आदिलशाहा पाच हजार स्वारांची तुकडी निजामशाहाच्या ताब्यात कायमची ठेवी आणि कुतुबशाहा खर्चापोटी रोख खंडणी वेळचेवेळेवर देत असे. ही मदत मोगलाला कळू न देता दिली जाई. शिवाय मोगली राजधानीत वकील पाठवून जमेल तितका खंडणीचा माल बादशाहाकडे पोहोचवीत तो वेगळाच. निजामशाहा मात्र आपल्या राज्याचा विस्तार करण्याच्या लालसेने किंवा खंडणी वसूल करण्याच्या दृष्टीने काही तरी आगळीक शोधून आदिलशाहीवर अधून मधून स्वाऱ्या करीतच असे. इब्राहिम आदिलशाहाला या आगळिकीला पायबंद घालावयाचा होता. आदिलशाहाजवळ मराठा बारगीर फार थोडे होते. पठाणी सेनापतींना डोंगराजंगलांतील लढा जमत नसे. अशा परिस्थितीत शहाजीसारखा नामवंत योद्धा मिळण्याचा संभव दिसताच इब्राहिम आदिलशाहाने शहाजीला 'सरलष्करी' व त्याचबरोबर वजिरी देण्याचे कबूल करून आपल्या राज्यात नेले. शहाजीने कर्नाटकातील काही मुलूख आदिलशाहास मिळवून दिला व उत्तरेकडील हरवलेला काही मुलूख सोडविला. इब्राहिम आदिलशाहाने शहाजीला चांगल्या रीतीने सांभाळले होते. मात्र आदिलशाहीतील अवघ्या अडीचतीन वर्षांच्या काळात तेथील राज्यकारभारात शाहाजीने एक मोठी क्रांती घडवून आणली. ती क्रांती म्हणजे मराठा सरदारांना वजिरीचा मान मिळवून देणे ही होय. शाहाजीने स्वत:स वजिरी मिळविली होतीच, परंतु तेथे गेल्यानंतर घोरपडे आदींनाही शिफारस करून वजिरीचा मान मिळवून दिला. मराठा सरदारांना इस्लामी सरदारांइतका समान दर्जा राज्यव्यवहारात लाभू लागला, परंतु शाहाजीचा इब्राहिम आदिलशाहाच्या कारकिर्दीतील वरचष्मा पठाणी

इस्लामी वजिरांना खपला नव्हता. साजजिकच इभ्राहिम आदिलशाहा मरतांच आणि महंमदशाहा गादीवर येताच व इस्लामी वजिरांनी शहाजीविरूद्ध उठाव केला. महंमदशाहा त्यांच्या कारवाईला बळी पडत आहे असे पाहून शहाजीने आदिलशाही सोडून परत निजामशाहीत जाण्याचा निर्णय घेतला. शहाजीबरोबरचे व नंतर विजापूरच्या सैन्यदलांत सामावलेले काही मराठे सरदार तेथेच राहिले. परंतु शहाजीची जागा भरून काढण्यासाठी व मराठा बारगिरांची कायम मदत राखण्याकरिता महंमद आदिलशाहाला मुरार जगदेव याला 'सरलष्करी' व वजिरी देणे भाग पडत असे. जो आदिलशाही लष्करी दर्जा व दबाव शहाजीच्या नेतृत्वाखाली वाढला होता तो कायम राखणे जरूर होते. परंतु शहाजीच्या बाबतीत आलेल्या अनुभवाने सहाजिकच मुरार जगदेव अधिक स्वतंत्रपणे व परका वागू लागला. आदिलशाही पठाणी आणि इतर इस्लामी सरदारांस त्यांचा हट्टीपणा अधिकच जाणवू लागला. सारांश, शहाजीच्या स्वकीयांच्या राज्यकारभारातील समतेच्या भावनेला जी क्रांतिकारक चालना मिळाली व तिच्या सफलतेबाबत जी जनतेत आकांक्षा दृढ होऊ लागली तीच पुढे 'हिंदवी स्वराज्या' च्या क्रांतिकारक चळवळीला पोषक ठरली. स्वदेशाच्या राज्यकारभारातील स्थानिक लोकांच्या अल्पसंतोषी वृत्तीला जबरदस्त धक्का बसला व राज्यनिर्मितीसाठी शक्तिसामर्थ्याची ह्या मंडळीत अधिकाधिक जाणीव उत्पन्न होऊ लागली.

५. शहाजी राजे व निजामशाही (इ.स.१६२८ ते इ.स.१६२९) :-

इ.स.१६२८ पासून शाहाजीच्या तिसऱ्या राजकारणाला प्रारंभ झाला. इ.स.१६२६ मधील मलिक अंबरच्या मृत्यूनंतर निजामशाहीच्या राज्यव्यवस्थेत बरीच ढिलाई आली. चतुर साबाजीला जरी शहाजीचा प्रांत दिला गेला होता तरी त्याला जहांगीरच्या दक्षिण प्रदेशाला पादाक्रांत करण्याच्या महत्वाकांक्षेला थोपवून धरता आले नाही. आदिलशाही मदतही खुंटलेली होती, त्यामुळे निजामशाहीतील इस्लामी कार्यकर्त्यांना आपले जुने कर्तबगार सरदार यांच्या साह्याची अपेक्षा धरणे प्राप्त झाले होते. शहाजी व लखुजी

जाधव, यांच्या सामर्थ्याबद्दल दक्षिण शाह्यात जो एक आदर व विश्वास निर्माण झाला होता व शत्रूस एक धाक उत्पन्न करण्याइतकी शक्ती व कीर्ती त्यांनी संपादन केली होती त्यांचे साह्य घेण्यासाठी साहजिकच मुस्लीम शाह्यांचे प्रयत्न चालू झाले. इकडे नवीन आदिलशाही कारभारामुळे शाहाजींचे मन वैतागले होते. त्याचा फायदा घेऊन शाहाजीला अधिक सरंजाम जहागिरी व अधिकार देऊन निजामशाहीच्या रक्षणार्थ आणण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आणि शहाजी इ.स.१६२८ च्या पावसाळ्यापूर्वी परिंड्यास येऊन दाखल झाला. पुन्हा सर्व जुळवाजुळवी करून मोगली सरदारांना तोंड देण्यास तयार झाला. दरम्यान जहांगीर २८ ऑक्टोबर, १६२७ रोजी मरण पावला. त्याच्यामागे मोगलाईत भाऊबंदकी माजली जाऊन मोगली राज्य स्थिरस्थावर होण्यात बराच काळ जाईल अशा समजुतीने जहांगीर आजारी झालेला समजताच दख्खनमधील मोगली अधिकाऱ्यांनी बंडाखोरीस प्रवृत्त होऊन कट केला. बालाघाट वगैरे मुलूख निजामशाहाकडे देऊन त्याबद्दल बरीच खंडणी घेऊन ते बंडाचा वणवा उत्तरेकडे नेण्याच्या कार्यास लागले. साहजिकच शहाजहानने, त्याच्या तत्कालीन परिस्थितीत या बंडखोरी प्रवृत्तीला मूक मान्यता देणे त्याला हितावह वाटले. परंतु जहांगीरच्या मरण्यानंतर अकल्पितपणे विनासायास शहाजहान ६ फेब्रुवारी, १६२८ रोजी तख्तावर आल्यामुळे बंडखोर मोगली अधिकारी केलेल्या अपराधाबद्दल बतावणीच्या गोष्टी सांगून आपली चाकरी व दर्जा टिकविण्याचा प्रयत्न करू लागले, तसाच शहाजहाननेही अधिकाऱ्यांना दिलासा देऊन मोगली राज्याचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी प्रयत्न करण्याचा आदेश दिला, परंतु त्यांत यश यावे तर निजामशाहाची बाजू शहाजीच्या पुनरागमनामुळे सबळ झाल्याने परत मिळालेला बालाघाटाखालील मुलूख न सोडण्याचा निजामशाही सरदारांनी हट्ट धरला. खानजहान व इब्राहिम यांना अपयश आल्याने त्यांना दरबारात परत जावे लागले. दरबारी जाऊन माफी मिळवली परंतु राजधानीत असता अफवा आली की, शहाजहान त्यांना मारणार आहे. त्यामुळे ते तेथून

पळाले व मोगली सत्तेविरूद्ध बंडाचे रणशिंग पुन्हा फुंकले. हे मोगली बंडखोर इ.स.१६२९ च्या पावसाळ्यापूर्वी दक्षिणेत आले. मात्र त्यांना शहाजीने इ.स.१६२८ चा पावसाळा संपल्यापासून ते १६२९ चा पावसाळा लागेपर्यंत निजामशाहीत मुलखात शिरू दिले नाही. मोगली बंडखोर लखुजी जाधव व शहाजी यांच्या मदतीने निजामशाहीला बरेच वर डोके काढता येण्यासारखी परिस्थिती निर्माण झाली होती. परंतु निजामशाही दरबारात लखुजी जाधव व त्याच्या मुलांचे फसवणूक करून खून केल्यामुळे सर्व पारडे फिरले व निजामशाहीला शेवटचे अचके देण्याची पाळी आली. शहाजी नाराज झाला व पुन्हा आपल्या पुणे जहागिरीत इ.स. १६२९ च्या पावसाळ्यात येऊन बसला. निजामशाही पुन्हा सामर्थ्यवान करून स्वकीय लोकांनीच पुढाकार घेऊन राखावयाची त्यांची स्वप्ने मात्र मावळली गेली. शहाजीला या वेळी इस्लामी राजा व स्वकीयांचे राज्य ही उस्फूर्त झालेली भावना तात्पुरती तरी सोडावी लागली. शहाजीच्या ह्या राजकारणावर थोड्याच अवधीत विरजण पडले. निजामशाहीतील इस्लामी सरदारांचा लखुजी जाधवांच्या खुनाचा डाव निजामशाहालाच आत्मघातकी ठरला.

६. शहाजी राजे व मोगलशाही (इ.स.१६२९ ते इ.स.१६३२) :-

आपल्या सासऱ्याचा दग्याने खून केलेला पाहून निजामशाहीत यापुढे राहणे धोक्याचे आहे व जो शहाजीला परत आणण्याचा प्रयत्न झाला त्यात काहीतरी कुटिल कारस्थानाचा भाग असला पाहिजे असा शहाजीचा समज झाला. आदिलशाहाला सोडून आल्याने त्याचा राग व आदिलशाहा निजामशाहाचा साह्यक या दृष्टीने, शाहाजीला साहजिकच मोगलांशी कारस्थान करणे भाग पडले. मोगली सत्ता बरीचशी अडचणीत आली होती. मोगलांचा बालाघाटाखालील प्रदेश परत निजामशाहीत आल्याने युद्धाची आघाडी, जी पुष्कळच पुढे आणली गेली होती ती, बरीच पिछाडीस गेली. लोदीचे बंड ही आणखी एक घरातच आघाडी उघडली गेली होती. लखुजी जाधवांचा वीसपंचवीस हजारांचा जमावही पांगला होता. शिवाय आदिलशाहा व निजामशाहा एकजुटीने तोंड

देण्यास सिद्ध झाले होते. अशा अडचणीच्या प्रसंगी मोगली चाकरीत घेण्याची शाहाजीची नासिरखानाच्या मार्फत केलेली विनंती तात्काळ त्याच्या अटींसह मान्य करून बादशाहाने फर्मानही त्वरीत पाठविले. त्यामुळे शहाजीकडे दहा हजार सेना आली. सरंजामार्थ पूर्वी मालोजीकडे असलेले पुणे, सुपे, जुन्नर, संगमनेर इ. परगणे दिल्याचे शहाजीस वचन आले. त्यामुळे शहाजीने आपला वडील मुलगा संभाजी याचे शिवनेरीवर लग्न करून स्वत: मोगली चाकरीवर नोव्हेंबर १६२९ मध्ये दाखल झाले. एक दोन महिन्यांत नासिरखानाबरोबर राहून, इब्राहिम लोदी वगैरे बंडखोरांचा पाठलाग करून त्यास उत्तरेकडे हाकलून देताच शहाजी आपल्या सरंजामाचा मुलूख निजामशाही सरदारांकडून ताब्यात घेण्याकरिता इ.स.१६३० च्या जानेवारीच्या सुरूवातीस निघाला. त्याला हा मुलूख आपल्या ताब्यात आणणे फारसे कठीण काम नव्हते. स्थानिक लोकांचा ओढा शहाजीकडे होता. या मुलखाचा बंदोबस्त करून शहाजी पुन्हा पावसाळ्यात शिवनेरीस गेला. आता हा सर्व भाग त्याची जहागीर झाली होती.

इ.स.१६३० चा पावसाळा कोरडा गेल्याने नंतर जो मोठा दुष्काळ पडला व रोगराई वाढली त्यात सर्वांचे बरेच सैन्य मृत्युमुखी पडले. लढण्यास त्राण राहिला नव्हता. त्यामुळे इ.स.१६३१ चे ही सर्व वर्ष विशेष प्रसंगावाचून गेले. या काळात फत्तेखानाच्या हाती निजामशाहीचा कारभार दिला गेला होता. फत्तेखानाला इतर इस्लामी वजिरांची भीती होती. म्हणून त्याने मोगलांचा आश्रय मागितला. मोगलांनी आश्रय देण्याचे कबूल केले, परंतु निजामशाहाला मारून टाकण्याची आज्ञा केली.

७. शहाजी राजे व निजामशाही (इ.स.१६३२ ते इ.स.१६३६) :-

फत्तेखानाने निजामाचा खून केला. तेव्हा मोगलाच्या हाती सर्वच निजामशाही जाणार असे पाहून शहाजीने मुरार जगदेव व खवासखान यांच्याशी संगनमत करून कोकणातून एक निजामशाही बाहुले आणून इ.स.१६३२ मध्ये ते उभे केले. त्याच्यावर जुन्नर येथे छत्र धरले. सहाजिकच शहाजीचे मोगलांशी वैरत्व आले. शहाजीने घेतलेला

सर्व मुलूख नवीन निजामशाहाचा म्हणून आपल्या ताब्यात ठेवला. फत्तेखानाशी तहाची बोलणी करून मोगल निजामशाही घशात टाकणार अशी कारस्थाने चालल्याचे ऐकून आदिलशाहाच्या मदतीने शहाजी फत्तेखानाकडून दौलताबाद घेण्याच्या तयारीला लागला. आदिलशाहाने भविष्यकालीन संकट ओळखून शाहाजीला मदत दिली. फत्तेखानाची त्यामुळे घबराट उडाली. किल्ला लढविण्याइतका त्याच्याजवळ धान्य व दारूगोळा नव्हता. त्याने मोगली मदत मागितली. ती गडाजवळ त्वरीत आली. आदिलशाही सैन्यही गडाच्या आसपास गेले. मुरार जगदेव याने दाणागोटा वगैरे देण्याचे कबूल केले. फत्तेखानाला आता गड मोगलांच्या का आदिलशाहाच्या ताब्यात द्यावयाचा याची विवंचना पडली. आदिलशाही लोकही त्याने गडावर घेतले. मात्र मुरारीने प्रथम गड आदिलशहाच्या ताब्यात देण्याचा आग्रह धरल्यावरून अडचण निर्माण झाली. दरम्यान फत्तेखानाने तो गड मोगलाविरूद्ध लढविण्यास सुरूवात केली होती. त्यात यश न येऊन मोगल सुरूंग उडवून वाट करून किल्ल्यावर चढून आले. हे पाहून त्याची घबराट उडाली. फत्तेखानाने मोगलांच्या ताब्यात किल्ला दिला व त्याबरोबरच त्यानेही जे एक पोर निजामशाहाचा वारस म्हणून ठेवले होते तेही मोगलांच्या स्वाधीन केले. तहात पूर्वी शहाजीला जे परगणे दिले होते ते मोगलांनी फत्तेखानाला बहाल केले. गडाचा बंदोबस्त केला. आदिलशाही सरदारांत जी फूट पडली होती त्याचा फायदा मोगलांना मिळाला. नंतर आदिलशाही सरदारांनी गड मिळविण्याचे प्रयत्न केले. ते अयशस्वी झाले आणि मुरार जगदेव व शहाजी आपल्या सैन्यासह परत गेले. इ.स.१६३३ च्या पावसाळ्यात मुरार जगदेव व शहाजी यांचा तळ तुळापुरास होता.

शहाजहानाने दख्खनची मोहीम जोरात करावयाची व आदिलशाही नेस्तनाबूद करावयाची या विचाराने शहाजी व आदिलशाहा यांच्याविरूद्ध दोघास दोन टोकास कोंडीत धरून पराभूत करण्यासाठी, जास्त सैन्य रवाना केले. नंतर खास बादशाहा या स्वारीचा निकाल करून टाकण्यासाठी आला. पहिल्या प्रयत्नात शहाजी कोंडीत न

सापडता आधीच आदिलशाहाच्या मदतीस गेला होता. मोगलास यश आले नाही. तहाची वाटाघाटी केली. आदिलशाही सरदारांनी तह नाकारला. मात्र या १६३४ च्या मोगली स्वारीमुळे मुरार जगदेव व खवासखान आदिलशाहाकडूनच मारले गेल्याने मुस्तफाखानाच्या गटाचा बराच वरचष्मा झाला होता. हा गट मोगलांशी पडते घेऊन तह करण्यास उत्सुक होता. परंतु तहाच्या अटीच मान्य करण्यासारख्या नव्हत्या. दुसऱ्या वर्षी म्हणजे इ.स.१६३५ मध्ये बादशहा खाली दक्षिणेत उतरल्याने मोगली फौजेने फार जोरदार लढे निरनिराळ्या दिशेने केले. शहाजी-संभाजीची बरीच धावपळ झाली. शहाजीचा जवळजवळ सर्व मुलूख मोगली फौजेने काबीज केला. मात्र महत्वाचे गड व शहाजी-संभाजी हे दोन मोहरे त्यांना काबूत आणता आले नाहीत. त्यामुळे गड नाही तोपर्यंत गडाखालील मुलखाची शाश्वती नाही. अर्थात मोगलांच्या तात्पुरत्या यशाला फारशी किंमत राहिली नव्हती. आदिलशाही हद्दीतही यशाची विशेष प्राप्ती झ ाली नाही. शिवाय हा मुलूख आणि विशेषतः गड लढविणे मोगली सैन्याला स्थानिक लोकांच्या मदतीविना अशक्यच होते. तेव्हा दक्षिणेत बराच मुक्काम झाल्याने बादशाहाही त्रासला. इ.स. १६३५ च्या पावसाळ्यात शहाजहानने पुन्हा तहाचे बोलणे लावले व आदिलशाहाला कृष्णा नदी अलीकडील मुलूख मोगलांकडे व पलीकडील आदिलशाहाचा म्हणून वाटणी करण्याचे ठरविले. आदिलशाहाला निजामशाहीचा मोठा प्रदेश मिळाल्याने त्यांनी करार मान्य केला. मात्र मोगली हद्दीतील सर्व गड मिळवून देण्याचे व शहाजी वगैरे बंडखोर लोकांच्या पारिपत्याचे काम आदिलशाहाकडे दिले व शहाजहान निघून मांडू येथे पावसाळ्यात गेला. आदिलशाहाने तह मान्य केला, परंतु शहाजी आदींनी त्यास मान्यता दिली नाही. आदिलशाहा व मोगल यांच्यात एकी झाली तरी शहाजीच्या धुमाकुळाला पायबंद बसेपर्यंत मोगली सुभ्याला स्वास्थ्य लाभणे शक्य नव्हते. शहाजी शरण येत नाही असे पाहताच मोगली सैन्याने जोरात त्याचा पाठलाग करण्यास सुरूवात केली. आदिलशाही सैन्यही कराराप्रमाणे मदतीला आले. शहाजीला

माहुली गडात घेरले. नाइलाज म्हणून शहाजीने आपल्या ताब्यातील मुलूख आपल्याकडे रहावा म्हणून मोगली चाकरीत जाण्याचे बोलणे लावले. त्याच्या हवाली पुणे-जुन्नर-संगमनेर प्रांत दिल्याने काय परिणाम भोगावे लागले याची शहाजहानाला चांगलीच अद्दल घडली होती. त्यामुळे जो शहाजी की ज्याची या प्रांतात नुसती हिंदूच नव्हते तर सिद्दी व मुसलमानही बाजू घेण्यास उत्सुक असतात त्याला या भागात ठेवू देण्यास तो मुळीच राजी नव्हता. उलट शहाजीला काही तरी हालचालीस मुभा न ठेवली व काही आमिष देऊन शांत न केले तर तो स्वस्थ बसणे शक्य नव्हते. त्याच्या संमतीविना या डोंगरी भागातील गड हाती लागून येथे स्थिरस्थावर होणे व निजामशाही मुलुख लाभणे दुरापास्त आहे याचीही जाणीव झाली होती. तेव्हा शहाजीला अपरिचित मुलखात मानाचे स्थान देऊन आपला मोगली प्रांत मोकळा करून घेणे योग्य व बिनत्रासाचे होईल या उद्देशाने शहाजीला आदिलशाहाच्या चाकरीत राहू देण्याचे मान्य केले. सारांश, शहाजीचे आपल्या प्रदेशात ठाण मांडून बसण्याचे राजकारण यशस्वी झाले नाही. त्याला कर्नाटकचा मार्ग स्वीकारावा लागला.

पुढे शहाजी राजांचे धोरण आदिलशाही बळकट करण्याचे आणि आदिलशाही अंतर्गत स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याचे होते. थोडक्यात, शहाजी राजांच्या कामगिरीचे मुल्यमापन करत असतांना असे दिसून येते की, त्यांनी स्थानिक निजामशाही ही सत्ता प्रबळ करण्यात योगदान दिले.

८. हिंदवी स्वराज्याचा पाया शहाजी राजे भोसले :

बंगलोर येथील शहाजी राजांच्या दरबाराचे संस्कृत कवींनी केलेले वर्णन विजयनगरच्या दरबाराच्या वर्णनाशी बऱ्याच प्रमाणात मिळते जुळते आहे. शिवाजी महाराजांच्या 'हिंदवी स्वराज्य' स्थापनेच्या प्रयत्नास शहाजी राजांचा हा कारभार निश्चितच प्रेरणादायी ठरला. शहाजी राजांच्या कार्याचे व कारकिर्दीचे (इ.स. १६०६ ते इ.स. १६३६) मूल्यमापन करताना एक गोष्ट आवर्जुन लक्षात घेतली पाहिजे, ती म्हणजे

शहाजी राजे निजामशाही-आदिलशाही-निजामशाही-मोगलशाही-निजामशाही असा प्रवास करीत राहिले तरी पूणे परिसरातील जहागीर मात्र त्याच्याच, ताब्यात राहिली आणि हीच पुणे, सुपे, चाकण, इंदापूर परगण्यातील जहागिरी 'हिंदवी स्वराज्याच्या' प्रारंभीची आधार ठरली. ही जहागीरी, येथील सरंजाम, कर्तबगार आणि निष्ठावान अधिकारी, फौजफाटा, जहागिरीचा खजिना या सर्व गोष्टी 'हिंदवी स्वराज्य' स्थापनेला निश्चितच लाख मोलाच्या ठरल्या.

शहाजी राजांची जहागिर 'हिंदवी स्वराज्याचा' आधार ठरली हे ऐतिहासिक सत्य नाकारता येत नाही. शहाजी राजांनी प्रत्यक्ष नसले तरी अप्रत्यक्षपणे तरी निश्चितच हिंदवी स्वराज्य स्थापनेच्या कार्याला प्रेरित केले म्हणून हिंदवी स्वराज्याचा पाया शहाजी राजे भोसले यांनी घातला असे म्हणता येईल.

९. उपसंहार :-

उपसंहार हे शोधप्रबंधातील शेवटचे प्रकरण असून या प्रकरणात संशोधनाचा निष्कर्ष दिला जाईल.

टिप : हा प्रस्तुत संशोधन विषयाचा प्राथमिक आराखडा असून संदर्भ साधनांच्या उपलब्धतेनुसार प्रकरणाच्या शिर्षकात आणि संख्येत बदल होऊ शकतो.

संदर्भ ग्रंथ सुची

१) मराठी रियासत भाग -१, गो. स. सरदेसाई, केशव भिकाजी ढवळे प्रकाशन पुणे.

२) अहमदनगरची निजामशाही, भ. व. कुंटे (अनुवाद)

३) राधामाधवविलासचंपू, जयराम पिंडये, वि. का. राजवाडे (संपादित)

४) शिवभारत, कविंद्र परमानंद, भा.इ.सं.मं. पुणे प्रकाशन.

५) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. त्रैमासिक, वर्ष पहिले, अंक-१.

६) भोसला वंश चरित्र (तंजावर शिलालेख), वि. का. राजवाडे (संपादित)

७) सभासद बखर, कृष्णाजी अनंत सभासद

८) एक्याण्णव कलमी बखर, वि. स. वाकसकर (संपादित)

९) शिवकालीन पत्र सारसंग्रह, शिवचरित्र कार्यालय पूणे प्रकाशन.

१०) शिवचरित्र प्रदिप, आपटे, दिवेकर (संपादित) भा.इ.सं.मं. पुणे प्रकाशन.

११) अर्वाचीन महाराष्ट्र इतिहास कालातील राज्यकारभाराचा इतिहास., पुणे विद्यापीठाद्वारे प्रकाशित.

१२) सप्तप्रकरणात्मक बखर (चिटणीस बखर), मल्हार रामराव चिटणीस.

१३) चित्रगुप्ताची बखर, का.ना. साने संपादित काव्य इतिहास संग्रह मासिकात प्रकाशित.

१४) शेडगावकर भोसल्यांची बखर, वि.ल.भावे प्रकाशन.

१५) शिवचरित्र साहित्य खंड १ ते १६, भा.इ.सं.मं. पुणे प्रकाशन व डायमंड प्रकाशन पुणे.

१६) ऐतिहासिक फारसी साहित्य खंड १ ते १६ - भा. इ. सं. मं, पुणे.

१७) 'श्री शिव छत्रपती', त्र्यंबक शंकर शेजवलकर मराठा मंदिर प्रकाशन मुंबई.

१८) शिवचरित्र निबंधावली, केळकर, आपटे (संपादित) भा.इ.सं.मं. पुणे प्रकाशन.

१९) शिवाजी निबंधावली खंड १ व २, केळकर, आपटे (संपादित) भा.इ.सं.मं. पुणे प्रकाशन.

२०) मालोजी राजे आणि शहाजी महाराज, वा. सी. बेंद्रे पार्श्व प्रकाशन कोल्हापूर.

२१) छत्रपती शिवाजी महाराज, वा. सी. बेंद्रे पार्श्व प्रकाशन कोल्हापूर.

२२) साधन चिकित्सा, वा. सी. बेंद्रे पार्श्व प्रकाशन कोल्हापूर.

२३) हिस्ट्री ऑफ मराठा भाग-१, ग्रँड डफ, कॅप्टन डेव्हीड केपन (अनुवाद)

२४) न्यू हिस्ट्री ऑफ दि मराठा, गो. स. सरदेसाई

२५) भारत इतिहास संशोधक मंडळ सूची, चि.ना.परचुरे व कानडे (संपादित) भा. इ. सं. मं. पूणे प्रकाशन

२६) बुसातीन-उस-सलातीन (विजापूरची आदिलशाही,), अइझबैरी, (अनुवाद : भ.व.कुंटे), पारसनीस (संपादित) वा. सी. बेंद्रे पार्श्व प्रकाशन कोल्हापूर.

२७) श्री. राजा शिवछत्रपती खंड १ व २, गजानन भास्कर मेहेंदळे, डायमंड प्रकाशन पुणे.

२८) वाका - इ - सुनोत

२९) शिवछत्रपतींची पत्रे खंड १ व २, अनुराधा कुलकर्णी, परममित्र प्रकाशन पुणे.

३०) मराठ्यांचा इतिहास ग्रंथसूची, कविता भालेराव, पॉप्युलर प्रकाशन पुणे.